REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १२ पुणें, बुधवार तारीख १३ नोव्हेंबर १९४६ अंक ४४

" Consent of the Central Government has been obtained to this issue under the Defence of India Rule 94 A by an Order of which a complete copy is open for public inspection at the Registered Office of the Company.

" It must be distinctly understood that in giving their consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any scheme or for ohe correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."

हें प्रॉस्पेक्टस् नसून फक्त माहितीपत्रक आहे. प्रॉस्पेक्टसची मूळ इंग्रजी प्रत रजिस्ट्रार ऑफ जॉइंट स्टॉक कंपनीज, मुंबई, यांच्याकडे नोंदविली आहे.

## दि पॉवर अॅन्ड एनर्जी कं., लि., पुणें

[ सन १९१३ च्या हिंदी कंपन्यांच्या कायद्यान्वयें स्थापन झालेली ]

**अधिकृत भांडवल : रु. १,००,००,००० ( एक कोटी )**

प्रत्येकी रु. २५ च्या ४ लाख ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें आहे.

**विक्रीस काढलेलें भांडवल : रु. ६०,००,००० ( साठ लाख )**

प्रत्येकी रु. २५ च्या दोन लक्ष चाळीस हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें.

शेअर–अर्जाबरोबरच प्रत्येक शेअरपोटीं रु. पंचवीस एकदमच भरावयाचे आहेत.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

१ श्री. ल. ब. भोपटकर, एम्. ए., एलएल. बी., वकील, अध्यक्ष कॉमनवेल्थ विमा कं. व इतर कंपन्या, अध्यक्ष. पुणें.
२ शा. गोवर्धनदास विठ्ठलदास, मालक : विठ्ठलदास साखळचंद, डायरेक्टर भारत इंडस्ट्रियल बँक लि. व इतर पुणें.
३ श्री. प्रभुदास केशवजी मेहता, व्यापारी व गिरणी मालक ... ... ... मुंबई.
४ श्री. एस्. एम्. जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर, कॉमनवेल्थ विमा कं. लि. व इतर कंपन्या ... ... पुणें.
५ श्री. वि. शं. वैद्य, डायरेक्टर वेस्टर्न इं. वि. कं. लि., डेक्कन पेपर मिल्स लि. व इतर ... ... पुणें.

ब्रोकर्सः—( १ ) आर. आर. नाबर अॅण्ड को. मुंबई. ( २ ) श्री. चंपकलाल देविदास, मुंबई. ( ३ ) पुणें शहरांतील व इतर ऑथराइज्ड ब्रोकर्स.

**ऑडिटर्सः**—श्री. जी. डी. आपटे, बी. ए., जी. डी. ए., आर. ए., पुणें. **रजिस्टर्ड ऑफिसः**—कॉमनवेल्थ बिल्डिंग, लक्ष्मी रोड पुणें. **मॅनेजिंग एजन्टसः**—फ्रेन्डस् इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि., मुंबई.

**कंपनीचा उद्देश :** कंपनीच्या मेमोरॅन्डम ऑफ असोसिअेशनमध्यें अंतर्भूत केलेल्या हेतुनुसार सदरहु कंपनी स्थापन झालेली आहे. तथापि **पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. चें बहुमत मिळेल इतके शेअर्स व त्याचप्रमाणें त्या कंपनीची मॅनेजिंग एजन्सी विकत घेण्याकरतां ही कंपनी मुख्यतः स्थापन होत आहे.**

**प्राथमिक खर्च :** हा खर्च रु. २०,००० चे वर जाणार नाहीं असा अंदाज आहे.

**मॅनेजिंग एजंटस :** मॅनेजिंग अेजन्टस्‌ना ता. १ नवंबर १९४६ पासून दरमहा दोन हजार रुपये वेतन व कंपनीचे नफ्यावर १०% कमिशन मिळेल.

**डायरेक्टर्स :** कंपनीच्या प्रत्येक डायरेक्टरनें कंपनीचे कमींतकमी दहा हजार रुपयांचे दर्शनी किंमतीचे शेअर्स घेतलेच पाहिजेत.

**डायरेक्टरांचे हितसंबंध :** श्री. अेस्. अेम्. जोशी व श्री. वि. शं. वैद्य हे दोघे मॅनेजिंग अेजन्सी फर्मचे डायरेक्टर व भागीदार आहेत. तसेंच श्री. प्रभुदास केशवदास मेहता हे मॅनेजिंग अेजन्सीच्या फर्मचे अेक भागीदार आहेत. श्री. अेस्. अेम्. जोशी व श्री. वि. शं. वैद्य यांचेकडून पूना अिलेक्ट्रिक स. कं. चे १७२८३ ऑर्डिनरी व १३३० प्रेफरन्स शेअर्स व मॅनेजिंग अेजन्सी राअिटस् या कंपनीनें ५५ लाख रुपयांस विकत घेण्याचा करार केला आहे.

**मताधिकार :** सर्व शेअर्स अेकाच पद्धतीचे असल्यानें सर्वांना सारखे अधिकार आहेत. भागीदारांस प्रत्येक शेअरला अेक मत आहे.

**उद्योगधंद्यांतील नवा मनु :** सर्वसाधारणपणें जनतेचा पैसा सुरक्षित ठिकाणीं गुन्तला जावा व योग्य व्याज नियमित मिळावें यासाठीं कांहीं विशिष्ट प्रकारचे धंदे अुपयुक्त ठरतात. व्यापारी अुलाढालींची युक्तीच ओळख होत असलेल्या आपल्या भांडवलाला पहिल्या प्रथमच नफा–तोट्याच्या तारेवर कसरत करणें झेपणार नाहीं. आणि म्हणूनच आज आपल्या समाजाची संपत्ति गुन्तविण्यास रोज वाढत्या मागणीचे नि कमी चढाओढीचे असे धंदे हवेत.

**पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. ही स्थापन होऊन आज २९ वर्षें झालीं. आज कित्येक वर्षें ती कंपनी ९% करमाफ व्याज देत आहे तेव्हां सुरक्षिततेची व योग्य व्याजाची काळजी नकोच.**

लायसेन्स पद्धतीमुळें अेका गांवांत दुसरी वीज कंपनी निघण्याची भीति नाहीं. आपल्या गांवांतील वीज कंपनीचे तुम्ही भागिदार होण्यांत कसलाही धोका नाहीं. पुणें शहरांत वीज पुरविणेचें लायसेन्स सन १९६७ पर्यंत या कंपनीकडेच आहे. या सर्व दृष्टींनीं जनतेनें जास्तींत जास्त संख्येनें शेअर्स घेअून हें कार्य आपुलकीच्या भावनेनें तडीस न्यावें अशी विनंती आहे.

**पॉवर अॅन्ड एनर्जी कं. लि. :** ही दी पूना अिलेक्ट्रिक स. कं. चे निर्णायक बहुसंख्य शेअर्स व संचालकत्व विकत घेत असल्यामुळें आतां ती कंपनी हिंदी लोकांच्या हातीं येत आहे. राजकीय क्षेत्रांत हिंदीकरण होत असतांना अशा परकीय भांडवलाच्या कंपन्याही हिंदी जनतेच्या मालकीच्या होणें अत्यंत अगत्याचें आहे.

# विविध माहिती

**आयात धान्यास १५ कोटींची सबसिडी—** हिंदुस्थानांतील अन्नाचा तुटवडा भरून काढण्यासाठीं सरकारला बाहेरून धान्याची आयात करावी लागते, तें धान्य महाग पडतें; परंतु त्यामुळें लोकांस पूर्वीच्याच दरानें धान्य मिळावें आणि किंमतींत अस्थिरता निर्माण होऊं नये, ह्यासाठीं हिंदुस्थान सरकार ह्या व्यवहारांतील तूट स्वतः सोसणार आहे. १९४६ सालीं ह्यासाठीं १५,५०,००,००० रुपये खर्च येईल.

**वाहून वाया जाणाऱ्या पाण्याचा उपयोग—** टाटांच्या वीजगृहांतून बाहेर पडणारें पाणी सध्या पातळगंगा, उल्हास व कुंडलिका ह्या नद्यांतून वहात जाऊन समुद्रास मिळतें. वाया जाणारें हें पाणी वरील नद्यांच्या खोऱ्यांच्या उन्नतीकडे कसें उपयोगांत आणतां येईल, ह्याविषयीं योजना आखून त्यांच्या अंमल बजावणीची व्यवस्था सुचविण्यासाठीं मुंबई सरकारनें कुलाबा जिल्ह्याच्या कलेक्टरांचे अध्यक्षतेखालीं एक कमिटी नेमली आहे.

**हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज—** व्याजाचा दरः २¾%; किंमतः ९९ रु. ८ आ.; फरतफेड : १९५४; रकम : ३५ कोटि रु.

फक्त १५ नोव्हेंबर रोजींच अर्ज स्वीकारले जातील. १५ मे व १५ नोव्हेंबर रोजीं व्याज दिलें जाईल. त्यांतून इनकमटॅक्स कापण्यांत येईल. प्रॉमिसरी नोटा किंवा स्टॉक, कोणत्याहि स्वरूपांत रोखे मिळतील.

**अखिल भारतीय फिल्म परिषद्—** वरील परिषद मुंबई येथें ता. १४ व १५ नोव्हेंबर रोजीं रावबहादूर चुनीलाल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भरणार आहे. श्री. बा. गं. खेर, मुंबईचे पंतप्रधान, हे परिषदेचें उद्घाटन करतील. प्रत्येक सिनेमा संस्थेस तीन प्रतिनिधी पाठवितां येतील.

**खेडेगांवीं उद्योगधंद्यांस चालना—** सहकारी औद्योगिक संस्था, भांडवल पुरवणाऱ्या बँका, मार्केटिंग संस्था व खेडेगांवीं उद्योगधंद्यांच्या वाढींत लक्ष घालणारे लोक आणि संस्था ह्यांची एक परिषद मुंबई सरकारच्या सहकारी खात्यानें नुकतीच पुणें येथें भरविली होती. दि. ब. काजी अध्यक्षस्थानीं होते. कांहीं विवक्षित क्षेत्रें निवडून त्यांतील खेडेगांवीं धंद्यांना सरकारनें शक्य तें सहाय करावें, आणि ज्या धंद्यांची आवश्यकता निर्विवाद आहे आणि ज्यांत जास्तींत ज्यास्त माणसें गुंतूं शकतील व अधिकांत अधिक कच्चा माल खपेल, असे धंदे प्रथम हातीं घेण्यांत यावेत, सरकारनें खेडेगावी धंद्यांना संरक्षण द्यावें, हातकताईच्या व हातमागाच्या सोसायट्यांच्या स्थापनेस सरकारनें प्रत्यक्ष सहाय करून हातभार लावावा, वगैरे ठराव परिषदेनें मंजूर केले.

**धान्याची परदेशांत खरेदी—** हिंदुस्थान सरकारनें १९४६-४७ च्या हिशेबी वर्षांत आतांपर्यंत ५६ कोटि, ७० लक्ष रुपयांचें धान्य परदेशांत खरेदी केलें आहे.

**लोखंड-पोलादाची वाटणी—** लोखंड व पोलाद ह्यांच्या वाटणीसंबंधीं हिंदुस्थान सरकारनें नवीन योजना जाहीर केली आहे. १९४७ मध्यें हिंदुस्थानांत ९,००,००० टन लोखंड-पोलादाचें उत्पादन होईल आणि फार तर १,५०,००० टन आयात होऊं शकेल. एकूण साडे दहा लक्ष टनांपैकीं तीन लक्ष टन रेल्वेजसाठीं राखून ठेवलें असून बाकीचें लोखंड-पोलाद कारखाने, उद्योगधंदे, मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांच्या पुनर्घटना योजना, नागरी मागणी, निर्गत, इत्यादींसाठीं उपलब्ध होईल. सध्याच्या मानानें १९४७ सालीं, नागरी मागणीस पुरवठा करण्यासाठीं दुप्पट लोखंड-पोलाद राखून ठेवलें आहे. मुंबई प्रांत, पश्चिम हिंदुस्थानांतील, गुजरातमधील व डेक्कनमधील हिंदी संस्थानें ह्यांचेमध्यें लोखंड-पोलादाची वांटणी करण्याचें काम आतांपर्यंत रिजनल डेप्युटि आयर्न अँड स्टील कंट्रोलरकडे होतें; आतां तें मुंबई सरकारकडे आलें आहे व त्यानें त्या कामासाठीं एक प्रांतिक रेशनिंग अधिकारी नेमला आहे. लोखंड-पोलादाचा पुरवठा मर्यादित असून, अगदीं तातडीच्या गरजाच फक्त भागवितां येणें शक्य होईल असा खुलासा मुंबई सरकारनें आतांच करून ठेवला आहे.

**सिंद्री येथील फर्टिलायझर कारखाना—** सिंद्री येथें स्थापन व्हावयाच्या कृत्रिम खतांच्या कारखान्यास ८ कोटि रुपयांची यंत्र सामुग्री लागेल. आतांपर्यंत ४ कोटींच्या यंत्रसामुग्रीची ऑर्डर दिलेली आहे. त्यापैकीं ३ कोटि, १३ लाखांची ऑर्डर ब्रिटिश कारखानदारांना मिळाली आहे. हिंदुस्थानांत फक्त ८½ लक्ष रुपयांची ऑर्डर देण्यांत आली आहे. यंत्रसामुग्रीच्या खरेदीवर एका ब्रिटिश फर्मला २% कमिशन देण्यांत येत आहे.

**परदेशीय चलनासाठीं अर्ज—** व्यापार, उद्योगधंदा, आरोग्य, शिक्षण, चैनीची सफर, इत्यादींसाठीं ज्यांना परदेशीं प्रवासासाठीं हुंडणावळीची आवश्यकता असेल, त्यांनीं ह्यापुढें हिंदुस्थान सरकारकडे अर्ज न करतां रिझर्व्ह बँकेकडे करावा.

**न्यूयॉर्क-कलकत्ता वैमानिक वहातुक—** न्यूयॉर्क-कलकत्ता वैमानिक वहातूक लवकरच सुरू होण्याचा रंग दिसतो. ४३ उतारू मावतील एवढीं विमानें हा पल्ला तीन दिवसांत गाठतील.

**घरमालकावर अवलंबून असलेले लोक कोणते!—** मनोरमाबाई प्रधान ह्या मुंबई येथें आपल्या स्त्रीधनाच्या घरांत रहात होत्या आणि त्यांत डॉ. एन. जोशी ह्यांचे भाड्याचें बिऱ्हाड होतें. मनोरमाबाईंच्या कुटुंबांत ११ माणसें होतीं. त्यांचे सासरे जंजिऱ्यास होते, त्यांनाहि मुंबईस आणण्याचा त्यांचा मानस होता. अशा रीतीनें रमाबाईंना स्वतःसाठीं जोशी ह्यांच्या बिऱ्हाडाची जागा हवी होती. स्मॉल कॉजेस कोर्टानें जोशी ह्यांना बिऱ्हाड हलविण्याचा हुकूम केला. "घरमालक व त्याचेवर अवलंबून असलेले ह्यांना लागणारी जागा मालकाच्या स्वतःच्या वापरांतली ठरते, मस्तुत प्रकरणांतील सासरा व इतर मंडळी मनोरमाबाईंवर अवलंबून असल्याचें सिद्ध झालेलें नाहीं. त्याचप्रमाणें रेंटॲक्टच्या ११ व्या कलमाप्रमाणें प्रस्तुत स्त्रीधन मालमत्ता त्यांचेसाठीं मनोरमाबाई धारण करीत होत्या, असेंहि म्हणतां येत नाहीं" असें सांगून हायकोर्टानें स्मॉ. कॉ. कोर्टाचा निवाडा फिरविला.


दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

हेड ऑफिस :
१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : २,९०,००,००० रु.
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,६२,९४६ रु.

स्थानिक शाखा : १ दादर, २ गिरगांव, ३ ग्रँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शीव, ७ विलेपार्ले.

इतर शाखा : ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ क्रॅडॉक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव ३९ संगमनेर ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १३ नोव्हेंबर १९४६



संस्थापक

प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. स. सह ४ रु. किरकोळ अं. २ आणे.

# आंतरराष्ट्रीय राजकारणाचा रागरंग

आक्रमक फॅसिस्ट राष्ट्रांविरुद्ध जिंकलें गेलेलें युद्ध सुरू होण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारण राष्ट्रांतर्गत संबंधांच्याच स्वरूपानें मुख्यतः व्यक्त होत असे. अस्तंगत झालेला जुना राष्ट्रसंघ नव्या संयुक्त राष्ट्र संघटनेसारखा प्रातिनिधिक नव्हता आणि त्यांत सोव्हिएट रशिआ आणि अमेरिका यांसारखीं दोन् बलाढ्य राष्ट्रें प्रथमपासून सामिल नव्हतीं. पैकीं अमेरिका जुन्या राष्ट्रसंघांत कधींच आली नाहीं आणि जर्मनींत फॅसिझमचा उदय झाल्यानंतर सोव्हिएट रशिआ जरी राष्ट्रसंघांत आला तरी त्याचें वजन आजच्यासारखें नव्हतें. अर्थात त्या काळांत–म्हणजे युद्धपूर्व काळांत–राष्ट्रांतर्गत तेढींच्या अगर सलोख्याच्या संबंधांनींच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे धागेदोरे विणले जात असत.

पण आज तशी स्थिती राहिलेली नाहीं. आजच्या जगांत संयुक्त राष्ट्र संघटना आणि राष्ट्रांतर्गत संबंध अशा दोन्ही प्रकारांनीं आंतरराष्ट्रीय राजकारण रंगरूप घेत असतें. त्यामुळें संयुक्त राष्ट्रसंघटनेंत आंतरराष्ट्रीय संबंधांचे प्रतिध्वनि उमटणें आणि संयुक्त राष्ट्र संघटनेनें राष्ट्रांतर्गत संबंधांना वळण लावण्याचा प्रयत्न करणें, या घटना आपल्या दृष्टीस पडतात. पॅरिसची शांतता–परिषद समाप्त झाल्यानंतर अमेरिका आणि रशिआ यांच्यांत अधिकच तेढ उत्पन्न झाल्याचें दृश्य दिसून आलें होतें. अमेरिकचे परराष्ट्रमंत्री मि. बर्न्स यांनींही या तेढीबद्दल चिंता व्यक्त केलेली होती. पण त्यानंतर मार्शल स्टॅलिन यांनीं यासंबंधी एक महत्वाची मुलाखत देऊन तूर्त तरी युद्धाची भीती आपणांस वाटत नसल्याचें जाहीर केलें. सोव्हिएट रशिआला जगाच्या राजकारणांत आज जें महत्वाचें स्थान प्राप्त झालें आहे; त्या दृष्टीनें त्या राष्ट्राच्या प्रमुखानें दिलेल्या या खातरजमेला महत्व आहे. त्यानंतर न्यूयॉर्कला भरलेल्या व चालू असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकींत रशिअन परराष्ट्रमंत्री एम. मोलोटाव्ह यांनीं जागतिक शांततेच्या दृष्टीनें दोन तीन महत्वाचे मुद्दे पुढें मांडलेले आहेत. पहिला मुद्दा शस्त्र-संन्याससंबंधीचा आहे. आजच्या अनिश्चिततेच्या वातावरणामुळें सर्व लहान मोठ्या–राष्ट्रांना मोठमोठीं सैन्यें व युद्धसामग्री सज्ज ठेवावी लागत आहे. यावर होणारा अवाढव्य खर्च टाळता आला, निदान बराच कमी करता आला तर, सामान्य लोकांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या मार्गांतील एक मोठी अडचण दूर होईल. पण अमेरिकन उत्पादनशक्तीची प्रचंड वाढ आणि अमेरिकन मक्तेदार भांडवलदारांना बाजारपेठांची लागलेली तहान लक्षांत घेतां अमेरिका शस्त्रसंन्यासासंबंधीं फारसें औत्सुक्य दाखवील असें वाटत नाहीं. त्यांतच अमेरिकन काँग्रेसच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकींत रिपब्लिकन पक्षाला निर्विवाद बहुमत मिळालेलें आहे. त्यामुळें अमेरिकन अंतर्गत अर्थव्यवस्था लवकरच नियंत्रणरहित होण्याचा संभव जवळ आला आहे आणि अशा अनियंत्रित भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा परिणाम अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणावर घडून येणें अनिवार्य आहे. विशिष्ट अमेरिकन राज्यघटनेमुळें कार्यकारी मंडळ व कायदेमंडळ यांच्यांत आतां पुढील दोन वर्षें संघर्ष उत्पन्न होईल. पण हा संघर्ष अमेरिकन् अंतर्व्यवस्थेच्या अंतर्गत कारभारापुरताच मर्यादित राहील. परराष्ट्रीय राजकारणाच्या धोरणांत डेमोक्रॅट्स व रिपब्लिकन या पक्षांत आज ध्येयाचा फरक नाहीं; साधनांचा आहे. रिपब्लिकन पक्षाच्या विजयामुळें अमेरिकन परराष्ट्रीय धोरण अमेरिकेच्या जागतिक व्यापार वाढीच्या महत्त्वाकांक्षेला अधिक पोषक होईल. नुकताच करण्यांत आलेली चीन–अमेरिका व्यापारी करार हें याच दिशेकडेचें पहिलें पाऊल आहे.

एम्. मोलोटाव्ह यांनीं मांडलेला दुसरा महत्वाचा मुद्दा शत्रु राष्ट्रें अगर त्यांची साहाय्यक राष्ट्रें सोडून इतर देशांत कोणाचें किती सैन्य आहे या संबंधीं माहिती मागवावी हा होता. या मागणीला अमेरिकेतर्फे पाठिंबा मिळाला आहे. एम्. स्टॅलिन यांनीं पूर्व युरोपांत रशियाचे ६० तुकड्या लष्कर असून लवकरच ते ४० तुकड्या इतकेच रहाणार असल्याचें जाहीर केलेलेंच आहे. ब्रिटनच्या जगभर पसरलेल्या सैन्याचा आढावा या मागणीमुळें संयुक्त राष्ट्रसंघासमोर येईल. ग्रीस, पॅलेस्टाइन, ट्रॅन्स-जॉर्डन, सिरिआ, लेबॅनान, इराक, इराण, हिंदुस्थान, इंडोनेशिआ अशा अनेक देशांतून ब्रिटनचें सैन्य असून त्यासंबंधीं माहिती उजेडांत येणें ब्रिटनच्या मजूर–सरकारला अडचणीचें वाटत आहे. अशा परिस्थितींत ब्रिटन या मागणीला पाठिंबा देणें संभवत नाहीं. उलट ब्रिटनमध्यें उद्योगधंद्यांत मनुष्यबळाचा तुटवडा पडला असतांना सक्तीच्या लष्करी भरतीच्या योजना आंखल्या जात आहेत. एम्. मोलोटाव्ह यांनीं मांडलेला तिसरा महत्वाचा मुद्दा विश्वस्त मंडळाच्या स्थापनेबाबत होत असलेल्या दिरंगाईबाबतचा आहे. मागासलेल्या देशांची आर्थिक व सांस्कृतिक उन्नति घडवून आणण्याच्या सदिच्छेनें विश्वस्त मंडळाची योजना आखली गेली खरी. पण योजनेचें पांघरूण घेऊन ब्रिटन ॲबिसिनिआसारख्या देशांत आपलें बस्तान नव्यानेंच बसवीत आहे. अमेरिका पॅसिफिक समुद्रांतील मोक्याचीं बेटें पचवूं पहात आहे आणि त्याचेच अनुकरण करून दक्षिण आफ्रिकेचे जनरल स्मटस् जर्मन–पश्चिम आफ्रिका आपल्या घशाखालीं घालूं पहात आहेत. जनरल स्मटस् यांच्या मागणीला हिंदी शिष्टमंडळानें संयुक्त राष्ट्र संघटनेंत विरोध केला असून त्या विरोधाला चीननेंहि पाठिंबा दिला आहे. हिंदुस्थानांत हंगामी सरकार अधिकारावर आल्यापासून हिंदी परराष्ट्रीय धोरण ब्रिटनच्या तंत्रानें न चालता स्वतंत्रपणें आचरणांत येण्याचीं पूर्व चिन्हें दिसूं लागलीं आहेत. दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी नागरिकांच्या छळाची चर्चा सुद्धां संयुक्त राष्टसंघांत होऊं नये यासाठी जनरल स्मट्स यांनीं खटपट करून पाहिली. पण अखेर हा प्रश्न कायदा व राजकीय समितीकडे सोपविण्यांत येऊन त्यासंबंधीं समितीनें संयुक्त राष्ट्रसंघास शिफारस करावी असें ठरलें.

रशिअन क्रांतिदिनाच्या २९ व्या वर्षदिनानिमित्त मार्शल स्टॅलिन या वर्षीं बोलले नाहींत. त्याच्या ऐवजी मध्यवर्ती सोव्हिएट कमिटीचे एम्. झ्डॅनॉव्ह यांनीं भाषण केलें. रशिअन सरकार व लोक शांततेचे भोक्ते असून ब्रिटन–अमेरिकेंतील कांहीं प्रतिगामी गटांनाच युद्धाची खुमखुमी आहे असा त्यांच्या भाषणाचा आशय आहे. समाजवादी अर्थ व्यवस्थेसंबंधी वाटणारा आत्मविश्वास, स्टॅलिन यांचे आज्ञापत्र व एम. झ्डॅनॉव्ह यांचें भाषण दोन्हींतही दिसून येतो. सोव्हिएट शास्त्रीय–विद्यापीठाचे प्रो. व्हॉव्हिलॉव्ह यांनीहि सोव्हिएट रशियांतलि शास्त्रीय प्रगतीविषयीं सूचक उद्गार या प्रसंगीं काढले.

---

**मद्रास सरकारचें खादीनिष्ठ धोरण**—मद्रास प्रांताच्या वाट्यांस ३,५२,००० चात्यांच्या १६ नव्या गिरण्या आल्या होत्या. परंतु खादीच्या प्रसारास त्यानें आडकाठी होईल, ह्यासाठीं मद्रास सरकार नव्या चात्या बसविण्यास परवानगी देणार नाहीं, असें गिरणवाल्यांना कळविण्यांत आलें आहे.

**हैद्राबादमध्यें इनकमटॅक्स**—हैद्राबाद संस्थानांत प्राप्तिवरील कर बसविण्यांत येणार आहे.

**स्त्रियांना शेतजमिनींत वारसा**—हिंदू पत्नीस, पतीच्या मृत्यूनंतर त्याच्या शेत जमिनींत हिस्सा मिळावा, ह्या दृष्टीनें कायद्यांत दुरुस्ती करण्याचा मद्रास सरकारचा विचार आहे.

**रेल्वेवरील मालवहातुकीच्या अडचणी**—मराठा चेंबरच्या शिष्टमंडळानें एम. एस. एम. रेल्वेचे चीफ कमार्शिअल मॅनेजर मि. पेरी ह्यांची पुणें येथें भेट घेऊन रेल्वेच्या वहातुकीबाबत व्यापाऱ्यांच्या अडचणी त्यांचेपुढें मांडल्या.

# स्फुट विचार

## बँकांच्या शाखांवर नियंत्रण—नवें बिल

बँकांनीं शाखांची स्थापना करणें व त्या बंद करणें, ह्यावर प्रभावी नियंत्रण घालण्याच्या हेतूनें मध्यवर्ती सरकारनें एक बिल असेंब्लींत मांडलें आहे. बँकांच्या शाखांची संख्या एकसारखी वाढत आहे, आणि जेथें वास्तविक आणखी बँकिंग कचेऱ्यांची आवश्यकता नाहीं अशा ठिकाणींच शाखा उघडल्या जात आहेत. त्याचें कारणहि स्पष्ट आहे. जेथें बँकिंगचा प्रसार अद्याप झालेला नाहीं, अशा केंद्रांत जाऊन प्राथमिक कार्य करण्यापेक्षा जेथें भरपूर काम उपलब्ध आहे अशा ठिकाणीं शाखा काढून त्या कामाचा जास्तीत जास्त वाटा मिळविण्याचा प्रयत्न करणें बँकांस सोपें वाटतें. हिंदुस्थानांत सध्या कोठेंना कोठें तरी, दररोज एक तरी नवी शाखा स्थापन केली जात आहे, असे आकडे दर्शवितात. नव्या शाखांनीं स्वीकारलेल्या ठेवी परत दिल्या गेल्या नाहींत, असें कांहीं बँकांच्या बाबतींत घडल्याच्या तक्रारी सरकारकडे गेल्या आहेत. नव्या शाखा स्थापन करतेवेळीं होणारा खर्च बँकेच्या ताकदीच्या बाहेर असतो, ठेवीवर व्याज भरमसाट दिलें जातें, वाढत्या खर्चाची तरतूद करण्यासाठी सोडतीच्या स्वरूपाचे व्यवहार करण्यांत येतात, अशुद्ध हिशेब लिहिले जातात, बँकिंगच्या व्यवसायाची माहिती नसलेले व विश्वास ठेवण्यास अपात्र असलेले मॅनेजर नेमले जातात, वगैरे अनिष्ट प्रकारांस आळा बसावा, ह्या दृष्टीनें बिलाची मांडणी केली आहे. नियोजित बँकिंग कंपनीज ॲक्टाच्या १८ (६) ह्या कलमांत बँकांच्या शाखांवरील नियंत्रणाची तरतूद केलेली आहे. रिझर्व्ह बँकेची आगाऊ लेखी परवानगी घेतल्याविना कोणत्याही बँकिंग कंपनीस नवी शाखा उघडतां येणार नाहीं आणि नव्या शाखेच्या स्थापनेमुळें सार्वजनिक हिताचें पोषण होईल अशी रिझर्व्ह बँकेची खात्री त्या बँकिंग कंपनीनें करून दिल्यावरच परवानगी दिली जाईल, असें तें कलम सांगतें. प्रस्तुत कायद्याचें बिल अद्याप मध्यवर्ती असेंब्लीमध्यें तपशीलवार चर्चिलें जावयाचें आहे. नेव्हां, त्या कायद्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ होण्यास अजून पुष्कळ अवकाश असल्याकारणानें, शाखांच्या स्थापनेवरील नियंत्रणाची व्यवस्था तात्काळ अंमलांत आणण्याचा नव्या बिलाचा उद्देश आहे.

## शाखांच्या वाढीचे आकडे

शेड्यूल्ड बँकांच्या शाखांत वाढ कशी होत चालली आहे, हे दर्शविणारे आंकडे खाली दिले आहेत. त्यांत, मुख्य कचेऱ्या, पे ऑफिसें, सब ऑफिसें इत्यादींचा समावेश केलेला आहे. ३०-६-१९४५ ते ३०-६-१९४६ ह्या १२ महिन्यांच्या मुदतींत शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या २,७१५ वरून ३,११५ झाली. म्हणजे, एकूण ४०० शाखांची भर पडली. ३०-९-१९४६ अखेर शेड्यूल्ड बँकांच्या शाखांची संख्या ३,१५७ झाली. शेड्यूल्ड बँकांनीं ७५ नव्या कचेऱ्या उघडल्या व ३ बंद केल्या. इंटर नॅशनल बँक ऑफ इंडियाचा बँकिंगचा व्यवहार बंद होऊन ती शेड्यूलमधून गळल्यामुळें शेड्यूल्ड बँकांच्या शाखांचे संख्येंत २५ ची घट पडली, परंतु शेड्यूलमध्यें नव्यानें दाखल झालेल्या ४ बँकांच्या ४७ कचेऱ्या यादींत प्रथमच आल्या. इंपिरियल बँक २, सेंट्रल बँक ११, पंजाब नॅशनल बँक ९, न्यू बँक ऑफ इंडिया ७, भारत बँक ६, हबीब बँक व एक्सचेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका प्रत्येकीं ४, बँक ऑफ जयपूर व इंडियन ओव्हरसीज बँक प्रत्येकीं ३, नॅशनल बँक ऑफ लाहोर, असोसिएटेड बँकिंग कॉर्पोरेशन, जोधपूर कमर्शिअल बँक आणि लक्ष्मी बँक प्रत्येकीं २, अशा नव्या शाखांची बँकवार वर्गवारी आहे. शेड्यूल्ड बँकांनीं उघडलेल्या शाखांची प्रांतवार वर्गवारी केली, तर पंजाब १६, मद्रास व संयुक्त प्रांत प्रत्येकीं १०, बंगाल ६, मध्यप्रांत ५, मुंबई ४, सिंध २, ओरिसा व सरहद्द प्रांत प्रत्येकीं १ आणि बाकीच्या १६ शाखा हिंदी संस्थानांत, असा हिशेब होतो.

शेड्यूल्ड बँकांच्या शाखा

| | ३०-६-४३ | ३०-६-४४ | ३०-६-४५ | ३०-६-४६ |
|---|---|---|---|---|
| इंपीरियल बँक ... | ३९६ | ४१० | ४२६ | ४३७ |
| पांच प्रमुख शे. बँका | ४१० | ५०७ | ६९१ | ६८१ |
| एक्सचेंज बँका ... | ८५ | ८० | ८० | ८६ |
| इतर शे. बँका ... | ७१६ | १,१४६ | १,५१८ | १,९११ |
| एकुण | १,६०७ | २,१४३ | २,७१५ | ३,११५ |

## बेअरर प्रॉमिसरी नोटांच्या ऑर्डिनन्सचें कायद्यांत रूपांतर

हिंदुस्थान सरकारनें १८ मे १९४६ रोजीं बेअरर प्रॉमिसरी नोट्स (प्रोहिबिशन ऑफ इश्यू) ह्या नांवाचा एक ऑर्डिनन्स काढून, ब्रिटिश हिंदुस्थानांतील बँकांना बेअरर प्रॉमिसरी नोटा काढण्यास बंदी केली. अशा नोटा काढण्यास कांहीं बँकांनीं प्रारंभ केला होता. मूळ खरेदीदाराचें नांव सुद्धां नोटेवर नसल्याकारणानें, नोटा काढणाऱ्या बँकेकडे जाऊन कोणीहि मनुष्य नोटा दाखल करून त्यांचे पैसे घेऊं शके. खरेदीनंतर ठराविक मुदत झाल्यावर नोटांचे पैसे मिळावयाचे, अशी ही योजना होती आणि ठराविक मुदत भरली म्हणजे त्या नोटा कोणासहि व केव्हांहि बँकेंत वटवतां येत असत. वास्तविक रिझर्व्ह बँकेसच अशा नोटा काढण्याचा अधिकार आहे. रिझर्व्ह बँक कायद्याच्या ३१ व्या कलमाचा त्यानें तत्वतः भंग होत होता, तो थांबविण्यासाठीं सरकारनें ऑर्डिनन्सचा अवलंब केला. ह्या ऑर्डिनन्सनें केलेली बंदी कायम करण्यासाठी हिंदुस्थान सरकारचें रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल असेंब्लींत मंजूर झालें आहे. कांहीं बँका सेव्हिंग्ज सर्टिफिकेटें किंवा ठेवींच्या पावत्या काढतात, त्यास ऑर्डिनन्स लागू नव्हता व नवें बिलहि त्यांस प्रतिबंध करणार नाहीं.

## अन्न-धान्याचा प्रश्न

मध्यवर्ती विधिमंडळांत हंगामी सरकारचे अन्नमंत्री डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं हिंदुस्थानांतील अन्नधान्य परिस्थितीचा आढावा घेतला. या बाबतींत आशेचे किरण दिसूं लागल्याचें त्यांनीं सांगितलें. पण दुसऱ्याच दिवशीं अन्नखात्याचे चिटणीस मि. सेन यांनीं सध्याच्या शिध्यांत कपात करण्यांत येणार नाहीं असें आश्वासन देण्याचें नाकारलें. यावरून सरकारला परिस्थिती आटोक्यांत आली नाहीं असें वाटत असल्याचें दिसून येतें. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं अन्नधान्याची टंचाई कमी करण्यासाठी तीन उपायांचा निर्देश केला: (१) परदेशांतून धान्य आयात करणें, (२) देशांतील धान्याचा उपयोग काटकसरीनें करून त्याची योग्य वाटणी करणें आणि (३) देशांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें. पैकीं परदेशांतून ४० लाख टन धान्याची मागणी करण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष आयात फक्त १७ लाख ५० हजार टनांचीच झाली. जरूरीपेक्षा अधिक अन्नधान्य पिकविणाऱ्या प्रांतांतून तुटीच्या प्रांतांत धान्य पाठविण्यासंबंधीं मध्यवर्ती सरकारला यावें तितकें यश आलेलें नाहीं. सर. पी. खारेघाट यांनीं, गेल्या तीन वर्षांत अवघ्या ५ ते ६ कोटी खर्चानें ३० लाख टन धान्य अधिक उत्पन्न झालें, आणि १०६ कोटी रुपये आयात धान्यावर खर्ची पडले असें सांगितलें. हें खरें असेल, तर मध्यवर्ती सरकारनें आयातपेक्षा आपल्या देशाची निर्मिती अधिक वाढविण्याकडे लक्ष देणें हिताचें होईल. आयात मालाची किंमत व देशांतील बाजारभाव यांच्यांतील तूट भरून काढण्यासाठी सरकारनें १५½ कोटी रुपये भरीला घातले अशी माहिती अन्नमंत्र्यांनीं सांगितली.

## हिंदी शेतीची सुधारणा

हिंदुस्थानच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर अन्नधान्याचें उत्पादन वाढलें नाहीं. उलट जागतिक अर्थव्यवस्थेशीं निकटचा संबंध आल्यापासून पैसा देणारीं व्यापारी पिकें अधिकाधिक काढण्याकडे शेतकऱ्यांचा कल होऊं लागला. मूळच्या समतोल हिंदी अर्थव्यवस्थेंत झालेलें हें

विघाड युद्धकालांत झपाट्यानें स्पष्ट झाला येवढेच. औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या हिंदुस्थानला नेहमी अन्नधान्याची आयात करणें परवडणार नाहीं. अर्थात् या परिस्थितीवर तोडगा म्हटला म्हणजे अन्नधान्याच्या उत्पादनांत वाढ करणें. मग ती अधिक जमीन लागवडीखालीं आणून करावी, किंवा लागवडीखालीं असलेल्या जमिनींतून दर एकरी अधिक पीक काढून करावी, किंवा दोन्ही उपाय एकदमच करावे. या दृष्टीनें शेती, जंगलें व मच्छीमारी या धंद्याची पहाणी करणाऱ्या समितीच्या किंमत-नियंत्रण कमिटीनें केलेल्या सूचना महत्वाच्या आहेत. सुपीक जमीन पाण्याच्या ओघानें वाहूं न देण्यासाठी बांध घालणें, पाणीपुरवठा करणें, चांगलें बियाणें देणें, मालाला बाजारपेठेंत नेण्याची सोय करणें इत्यादी उपाय आतां सर्व परिचित झालेले आहेत. आणि ते फलदायी होण्यासाठीं कमिटीनें सुचविल्याप्रमाणें मध्यवर्ती सरकार, प्रांतिक सरकारें व संस्थानें यांनीं एकदम एकदिलानें प्रयत्न केले पाहिजेत हेंही खरें. या बाबतींतील राजकीय अडचणी डोळ्याआड केल्या तरी शेतकऱ्यांच्या डोक्यांवरील कर्जाचा विचार कमिटीनें करणें आवश्यक होतें. शिवाय हिंदुस्थानांतील जमीन-महसुलाची पद्धतही जमिनी उत्तम तऱ्हेनें कसण्यास अनुकूल नाहीं. शेतींत झालेल्या सुधारणांचा फायदा जर प्रत्यक्ष जमीन कसणाराला मिळणार नसेल तर तो या बाबतींत उदासीनच रहाणार. शेतीच्या मालाच्या किंमती ठरविण्याबरोबरच मध्यवर्ती सरकारला जमीनमहसुलाच्या व कर्जाच्या प्रश्नाचाही विचार करावा लागेल. एरवी हा प्रश्न शेतीचें उत्पादन वाढविण्याच्या नुसत्या तांत्रिक शिफारशींनीं सुटणारा नाहीं.

---

## दि पॉवर अँड एनर्जी कं. लि., पुणें

पूना इलेक्ट्रिक सप्लाय कं. लि. मध्यें आणि तिच्या मॅनेजिंग एजन्सीमध्यें निर्विवाद बहुमत मिळविण्यासाठीं मुख्यतः वरील कंपनी स्थापन झाली आहे. आज श्री. एस. एम. जोशी व श्री. व्हीं. एस. वैद्य यांच्याकडे पू. इ. स. कंपनीच्या १७,२८३ ऑर्डिनरी व १,३३० प्रेफरन्स शेअर्सची मालकी आहे. हे शेअर्स ५५ लक्ष रुपयांस पॉवर अँड एनर्जी कं. लि. विकत घेणार आहे. त्यानंतर या कंपनीकडे पू. इ. स. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी जाईल. पॉवर अँड एनर्जी कंपनीनें ६० लाख रुपयांचे २ लक्ष, ४० हजार ऑर्डिनरी भाग विक्रीस काढले आहेत. तिचे श्री. ल. ब. भोपटकर हे चेअरमन असून, श्री. जोशी, श्री. वैद्य, श्री. प्रभुदास मेहता, शा. गोवर्धनदास विठ्ठलदास हे डायरेक्टर आहेत. प्रत्येकानें १० हजारांचे शेअर्स घेतले आहेत. पॉ.अँड ए.कंपनीची मॅनेजिंग एजन्सी फ्रेन्डस इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट लि.,मुंबई,यांचेकडे रहाणार आहे. या ट्रस्टचे श्री.जोशी,श्री.वैद्य व श्री. मेहता हे भागीदार आहेत. मॅनेजिंग एजंटांना वार्षिक २४ हजार रु. अलावन्स व नफ्यांत १०% हिस्सा मिळावयाचा आहे. पुणें इ. स. कंपनी आज २९ वर्षें चालू आहे आणि पुणें शहरांत वीज पुरविण्याचें लायसेन्स १९६७ पर्यंत तिच्याकडेच आहे. कित्येक वर्षें ती ९ % करमाफ डिव्हिडंड देत आहे. पॉवर अँड एनर्जी कं. लि. च्या बोर्डावर दिखाऊ डायरेक्टर कोणीच नसून, बहुतेकांचा कंपनीच्या व्यवहाराशीं निकट हितसंबंध आहे ही गोष्ट विशेष महत्वाची आणि त्यामुळें कंपनीच्या यशस्वी कारभाराला पोषक आहे.

---

## सन्मित्र को. अर्बन बँक लि., मुंबई

मुंबई शहरांतील सारस्वत समाजाच्या संस्थांचा आदर्श समोर ठेवून देवरुखे समाजाच्या वरील बँकेनें आपली प्रगति घडवून आणण्याचा निश्चय केला आहे. व्यवस्थापक मंडळाची कळकळ अहवालांत स्पष्ट दिसून येते. बँकेस निवळ नफा २, ३६३ रु. झाला व भागीदारांस ३¾% डिव्हिडंड मिळालें. नव्या वर्षाकरितां श्री. मादुस्कर व श्री. भोळे यांची अनुक्रमें अध्यक्ष व ऑ. सेक्रेटरी या जागीं पुनः निवडणूक झाली आहे.

## श्री. महावीर को. बँक लि., कोल्हापूर

वरील बँकेचें वसूल भांडवल ५०,६८० रु., रिझर्व्ह फंड ३०,७१९ रु. याप्रमाणें ८१,३९९ रुपयांचें स्वतःचें भांडवल आहे. त्याचें एकूण ठेवींशीं (४ लक्ष, ६ हजार रु.) प्रमाण अत्यंत समाधानकारक आहे. गुंतविलेल्या रकमांतही लहान मुदतीचीं कर्जेच अधिक आहेत. भागीदारांस ७½% डिव्हिडंड मिळालें.

## विड्यांच्या कारखान्यांतील मजुरांची परिस्थिति

### रेगे कमिटीचा रिपोर्ट

बिडी, सिगारेट व सिगार या धंद्यांतील मजुरांच्या परिस्थितीबाबत रेगे कमिटीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. मजुरांच्या दृष्टीनें पहातां, विड्या वळण्याचा धंदा सर्वस्वी अनियंत्रित आहे. या धंद्यांत सुमारें ५ लक्ष हिंदी लोक काम करीत आहेत, त्यांपैकीं मध्यप्रांतांत १,२५,०००; दक्षिण हिंदुस्थानांत व मुंबईंत प्रत्येकीं १,००,००० व इतर बाकीच्या प्रांतांत व संस्थानांत आहेत. स्त्रिया व मुलें यांचा मजुरांत फार मोठ्या प्रमाणावर भरणा आहे, हें विडींच्या धंद्याचें एक वैशिष्ट्य आहे. मध्यप्रांतांतील मजुरांत ४०% स्त्रिया आढळतात; दक्षिण हिंदुस्थानांत त्यांचें प्रमाण ३०% पडतें. अगदीं लहान वयाच्या मुलांस विड्यांचें काम देण्यांत येतें ही गोष्ट अनिष्ट आहे. मद्रास शहरांत लहान मुलांचें एकूण मजुरांशीं प्रमाण १८% व वेलोरमध्यें २९% पडतें. म्हैसूर संस्थानांत तें २५% आहे. मुंबई व मध्यप्रांत यांत तें ७% आहे. विड्यांचे कारखानदार स्वतः मुलांना नेमीत नाहींत, तर मजूरच त्यांना हाताशीं घेत असतात, असें रेगे रिपोर्टानें सांगितलें आहे. ५० किंवा ज्यास्त विडी कामगारांच्या कारखान्यास मध्यप्रांतांत फॅक्टरी ॲक्ट लागू आहे. मुंबई प्रांतांत २० कामगारांचा कारखाना फॅक्टरी ॲक्टाखालीं येतो. मद्रास आणि बंगाल यांतील विडीच्या कारखान्यांस फॅक्टरी ॲक्ट लागू नाहीं. विडी कारखान्यांतील काम वक्तशीर नसतें. घरीं वळण्यासाठीं विड्या देण्याची पद्धत बंद करून एका छपराखालीं सर्वांना काम देण्याची व्यवस्था करण्याचें अगत्य रेगे कमिटीनें प्रतिपादन केलें आहे. असें केलें तरच कामगारांच्या सुखसोईबाबत प्रभावी उपाय योजना करतां येईल, हें उघड आहे. कामाची गलिच्छ जागा, दीर्घ वेळ काम, स्त्रिया व मुलें यांचेकडे मजुरीचें काम, कंत्राटदारीची पद्धत, इत्यादींवर रेगे कमिटीनें टीका केली आहे आणि स्त्री-मजुरांची मोठी संख्या लक्षांत घेऊन फॅक्टरीच्या पहाणीसाठीं स्त्री-इन्स्पेक्टरांची नेमणूक सुचविली आहे.

---

## दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

(वार्षिक सभा : १६-११-१९४६)

हिंदुस्थानांत मशीन टूल्सच्या उत्पादनाचें महत्व निर्विवाद आहे. याबाबत म्हैसूर किर्लोस्कर लि. नें मशीन टूल्स पुरवण्याच्या बाबतींत उत्कृष्ट कार्य केलें आहे आणि त्यासंबंधांत हिंदुस्थान सरकारच्या डायरेक्टर्स जनरलनीं (इंडस्ट्रीज अँड सप्लाईज) प्रशंसोद्गार काढले आहेत. कंपनीनें टॅरिफ बोर्डाकडे संरक्षणाच्या मागणीचा अर्ज केला आहे व तें मिळण्याचा डायरेक्टर बोर्डास विश्वास वाटत आहे. पिग आयर्न आणि कोक यांचा नियमित व पुरेसा पुरवठा होण्याबद्दल कंपनीचे प्रयत्न चालू आहेत. कारखान्याच्या वाढीच्या योजनाही चालू आहेत. कंपनीचे डेप्युटी जनरल मॅनेजर श्री. आर. एल. किर्लोस्कर यांना मशीन टूल्स व स्मॉल टूल्स यांच्या उत्पादनाचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठीं मुद्दाम इंग्लंडमध्यें पाठविण्यांत आलें होतें. जर्मनींतील उत्पादनपद्धति पहाण्यासाठीं तेथून त्यांची हिंदुस्थान सरकारनें पुनः निवड केली. श्री. किर्लोस्कर हे भरपूर माहिती व अनुभव मिळवून आतां परत दाखल झाले आहेत. त्याचा कंपनीला चांगला फायदा होईल. कंपनीचें एकूण खेळतें भांडवल २५ लक्ष रुपयांचें आहे. ३० जून १९४६ अखेरच्या वर्षी कंपनीनें सर्व खर्च भागवून, १,८३,५८८ रुपयांचा घसारा काढून व ७३,००० रुपयांची कराची तरतूद करून ५१,७८७ रु. निवळ नफा मिळवला. भागीदारांस ५% डिव्हिडंड देण्यास ५०,००० रु. लागतील. कंपनीची मॅनेजिंग एजन्सी किर्लोस्कर बंधु लि. कडे आहे, त्यांस अलावन्स व कमिशन मिळून २८,०२० रु. मिळाले.

---

## बँक ऑफ कराड लि.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया पैशाच्या वर्गावर्गीस ज्या बिगर शेड्यूल्ड बँकांस सवलती देते, त्या बँकांच्या यादींत बँक ऑफ कराड लि. चें नांव समाविष्ट करण्यांत आलें आहे. या यादींत ८२ बिगर शेड्यूल्ड बँका आहेत.

## इंग्रजांना कोळशाची काळजी

### कॉमन्स सभेंतील चर्चा

"वीस वर्षांपूर्वी आपण कोळसा विकण्याची भाषा बोलत होतों; आतां त्याच्या बचतीची काळजी वाहतों. तेव्हां, कोळशाचे नवे उपयोग आपण शोधीत होतो; आतां कोळशाऐवजी दुसरें कांहीं वापरतां येईल काय, हें पहात आहों. नवीन बाजारपेठांची भाषा आतां बंद होऊन नियंत्रणेंच सर्व दिसूं लागलीं आहेत., परदेशी हुंडणावळ मिळविण्याच्या दृष्टीनें ब्रिटिश कोळशाची निर्गत अत्यंत महत्त्वाची होती. कित्येक देश कोळसा घेऊन आपणांस अन्न व कच्चा माल देत असत. ह्या बाजारपेठा आतां नाहींशा होत आहेत." :—मि. हॅरोल्ड मॅकमिलन

" ॲटॉमिक शक्ती उपलब्ध झाली तरी सुद्धां कोळसा हाच आपल्या राष्ट्रीय संसाराचा पाया दीर्घकाळ रहाणार आहे. कोळशाखेरीज आपल्या लोकसंख्येच्या २५ टक्के इतकीसुद्धां संख्या आपणांस राखतां येणार नाहीं. १४ ते १८ व्या शतकांपर्यंत लोकरीचें जें महत्त्व होतें, तें १८ व्या व १९ व्या शतकांत कोळशास प्राप्त झालें. कोळसा पुरेसा नसेल, तर आपले कारखाने चालणार नाहींत, शहरें व गांवें उठतील आणि लोकसंख्या कमी होईल ":- मि. डी. जे. विल्यम्स

**चांदीच्या नाण्यांस निरोप**—चांदीच्या नाण्यांऐवजीं निकेलचीं नाणीं ग्रेट ब्रिटनमध्यें चालू करण्यांत येत आहेत. सुमारें १,२०० वर्षें चालू असलेली चांदीची नाणी नाहींशी होणार, म्हणून तेथील पुराणवादी लोकांना वाईट वाटत आहे. उधार उसनवार घेतलेली अमेरिकेची चांदी त्या देशास ऐनजिनसी परत करावयाची असल्यामुळें, ग्रेट ब्रिटनला नाण्यांतील धातू बदलणें भाग पडलें आहे. हिंदुस्थानांतील नाण्यांतील चांदी ह्याच कारणासाठी नाहींशी झाली आहे.


**पाऊस व पिकें**—वेळेवर पडलेल्या पावसामुळें उभ्या पिकाची परिस्थिति सुधारली आहे आणि नव्या लागवडीस तो पाऊस उपकारक झाला आहे, असें मुंबई सरकारचा रिपोर्ट सांगतो.

**पर्शिआ-रशिआ विमान-वहातूक**—उत्तर इराणमधील आझरबजन प्रांताला इराणी मध्यवर्ती सरकारनें सांस्कृतिक स्वायत्ततेचे अधिकार दिल्यानंतर रशियन लष्कर त्या प्रांतांतून मागें घेण्यांत आलें होतें. इराणचे मुख्य प्रधान एम्. सुलतानेह यांनीं आतां रशियाशीं विमान-वहातुकीच्या करारासंबंधीं बोलणीं चालू केलीं असून लवकरच करारमदारावर सह्या होतील असें समजतें. इराणच्या उत्तर भागांत रशियन विमानांच्या वहातुकीला सवलती देण्यांत येणार अशी बातमी आहे. तसें झालें तर मध्यपूर्वेंतील एका महत्त्वाच्या देशाच्या विमान-वहातुकींत इंग्लंडबरोबरच रशियालाहि प्रवेश मिळून आधींच असलेल्या स्पर्धेंत भर पडण्याचा संभव आहे.

**रशियाचे परागंदा नागरिक**—झारच्या अंमलापासून जपानमध्यें अगर जपान शासित प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्या रशियन नागरिकांना आणि त्यांच्या मुलांना रशियन नागरिकत्वाचे हक्क देण्याचें रशियन सरकारनें ठरविलें आहे. रशियन पंचवार्षिक योजनेला सध्यां मनुष्यबळाचा तुटवडा जाणवत आहे. तो अंशतः भरून काढण्याचा एक मार्ग म्हणून हा उपक्रम करण्यांत आला असावा.

**ना. शास्त्र्यांच्या स्मरणार्थ निजामांची देणगी**—ना. शास्त्री यांच्या स्मरणार्थ जमविण्यांत येणाऱ्या फंडाला निजाम सरकारनें २५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. बनारस विद्यापीठाच्या वसतिगृहासाठीहि ५ लाखांची देणगी देण्यांत आली आहे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८








साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादनशक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी






मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

## मुंबई शेअर बाजार

(वि. म. लिमये आणि मं. यांजकडून)

| १९४५ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार ५।११।४६ | बुधवार ६।११।४६ | गुरुवार ७।११।४६ | शुक्रवार ८।११।४६ | सोमवार ११।११।४६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २६०५; १९८० | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्डस् | ३० | | २९४०-० | २९३२-८ | २९१०-० | २९२०-० |
| ४८०; ३७२ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | | ५३१-८ | ५३२-० | ५२६-० | ५२८-० |
| २२२२-८; १७६३-१२ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | | ३०४५-० | ३०४०-० | ३०१०-० | २९७५-० |
| ७०२; ५६६ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | | ९५९-० | ९५९-० | ९३३-० | ९४१-० |
| ६६८; ५०७ | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | | ७७९-० | ७७२-० | ७५९-० | ७६४-० |
| ४४३-८; ३६० | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | | ४२६-० | ४२४-० | ४१८-० | ४२२-८ |
| ३४२-०; २७५ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | | ४२४-० | ४२२-० | ४१८-० | ४१८-० |
| ३३५; २८३-८ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | | ४०४-० | ४०३-० | ३९२-० | ३९६-० |
| ३३७; २४३ | ९-०-०S | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | बाजार बंद | ४४५-८ | ४४२-० | ४४०-० | ४४२-० |
| ५; ३-११-० | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | | ५-६-६ | ५-७ | ५-६ | ५-६-० |
| १७-१०; १३-७-० | ०-१५-८ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | | २२-७ | २२-७ | २२-२ | २२-२-६ |
| ३-१०; २-९ | ०-३-० | मे | ,, डिफर्डस् | १ | | ५-१ | ५-०-६ | ४-१५-६ | ५-०-० |
| ७९०; ६४५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | | ८१०-० | ८०२-८ | ७९२-८ | ७८०-० |
| २४३-८; २०६-८ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | | २४४-१२ | २४३-८ | २४३-० | २४४-० |
| २५६; २१३-८ | ८-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | | ३६८-० | ३६२-० | ३६१-० | ३६५-० |
| ५९२-८; ५१०-० | ७-८-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | | ७३३-१२ | ७३२-८ | ७१२-८ | ७२५-० |
| ४३-७; ३०-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | | ४८-१५ | ४८-६ | ४८-३ | ४८-५ |

आंध्र खादीचे
(म्हणजेच ४० नंबराच्या वरच्या नंबराच्या सुताच्या खादीचे)
—एकमेव विक्रेते—

# खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ सांगली, ३ शाहुपुरी, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विकी केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,२३,६०० |

खेळतें भांडवल अंदाजें ३० लाखांवर

—: अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—




लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

## दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

नांगर —यांचे— चरक

किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) — विश्वास ( चार बैली )
किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) — वासुदेव ( दोन बैली )
किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) — राजा ( एक बैली )

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत

# दि सुप्रीम म्यूच्युअल अॅशुअरन्स कंपनी लि.

**हेड ऑफिस :**

८६६ सदाशिव पेठ, पुणें २

**शाखाः—नागपूर, हुबळी व कराची**

वसाहतीच्या योजनाः—पुणें, सोलापूर, माझगांव, ( बेळगांव )

आकर्षक विम्याच्या योजना, सवलतीचे हप्त्याचे दर व विमेदारांना जास्तींत जास्त फायदा ह्यासाठी विमेदार हीच कंपनी नेहमी पसंत करतात.

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी.
मॅनेजर.

सर्व प्रमुख गांवीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

# शेअर्स विकणें आहेतः—

गोवर्धन डेअरी फार्म्स लि.,
गोवर्धनवाडी, पुणें १.

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लि.,

—: पुणें शहर :—

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, खोपोली, ओझर ( जि. नाशिक )

**एकूण खेळतें भांडवल रु. ४८ लाखांचेवर**

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. के. व्ही. केळकर, M. A., LL. B. ( अध्यक्ष ) | श्री. बी. बी. वाळवेकर, M. L. A. ( उपाध्यक्ष ) |
| श्री. वि. वि. वर्तक | श्री. डी. डी. देशपांडे, B. E. ( Ele. & Mech. ) |
| शेट गोवर्धनदास विठ्ठलदास | श्री. के. बी. साळवेकर |
| सौ. इन्दुमतीबाई फडके, B. A. ( Hons. ) | श्री. बी. पी. केळकर |
| शेट वाडीलाल साकळचंद | श्री. बी. बी. भाजेकर, B. A., B. Com., LL. B. |
| श्री. एम्. एन. परांजपे, B. Sc. | श्री. के. पी. जोशी |

( गतवर्षी ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें आहे. )

* मुंबई, नगर, नासिक, बेंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे गांवांवर डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

—सर्व प्रकारचे बॅंकिंगचे व्यवहार केले जातात.—

रा. बा. साळवेकर, B. A., LL. B. } मॅनेजिंग
नि. ना. क्षीरसागर } डायरेक्टर्स

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. धों. कृ. साठे, चेअरमन

श्री. वा. पु. वर्दे, श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मसठे,
श्री. र. चिं. सोहनी, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पद्मजी,
श्री. म. वि. गोसले, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर

—भाण्डवल—

अधिकृत रु. ५०,००,००० खपलेलें रु. २५,००,०००
जमा रु. १२,५०,००० रिझर्व्ह व इतर फंड रु. ३,००,०००
एकूण खेळतें भाण्डवल रु. १,८०,००,०००

—:शाखा:—

डेक्कन जिमखाना, खडकी, मुंबई ( फोर्ट ), गिरगांव, जळगांव, नागपूर, कोपरगांव, रत्नागिरी, सोलापूर, धुळें, चाळिसगांव व फैजपूर ( पे–ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

**एक्झिक्यूटर व ट्रस्टी कंपनीचे कामास सुरवात झाली आहे.**

सी. व्ही. जोग
मॅनेजर
















पुणें चीफ एजंटः–
न्यू दत्त एजन्सी,
१००, रविवार पेठ, मोती चौक,



हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.